www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–17 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 29 डिसेंबर 2025 ■ किंमत 2 रूपये, पाने –4



श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिन्याकरिता बंद

पान ४ वर

# गुंड प्रवृत्तीचा मोतीराम थोरे हा घरमालक अरोरा यांच्या कुटुंबालाच देतो जीवे मारण्याची धमकी...

## ७५ वर्षीय वृद्ध घरमालकिणीला घरात कोंडले; शिवीगाळ, धमक्या आणि सीसीटीव्हींची तोडफोड

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

कवलदीप दिलजितसिंग अरोरा यांचा मुलगा कामाच्या निमित्ताने पुणे येथे राहतो. कवलदीप अरोरा त्यांची सूनबई वरिंदर सुमीत अरोरा हे दोघेही छत्रपती संभाजीनगर येथे एन-५ येथील सावकरनगर येथे राहतात. सुरूवातीला दिलजितसिंग अरोरा यांनी मोतीराम नामदेव थोरे व सुरेखा मोतीराम थोरे यांना भाडेतत्वावर हे घर दिले होते. परंतु सुरूवातीला काही दिवस चांगल्या राहिल्यानंतर यांची नियत फिरली व मालमत्तेवर डोळा ठेवू लागले. दिलजितसिंग अरोरा यांच्यावरही त्यांनी अनेकदा प्राणघातक हल्ले केले परंतु ते सहन करत केले. नेहमीच दादागिरी अश्लील शिवीगाळ करणे हे तर त्यांच्या नित्याचेच झाले.

भाडे करार संपला तरी करार करण्यास विरोध करू लागले. भाडे मागायला गेले की, मारण्याची धमकी द्यायचे वयोवृद्ध असल्यामुळे काही हिंमत होत नव्हती. एक दिवस तर त्यांनी दिलजितसिंग अरोरा यांना पाण्याच्या हौदात बुडवून जीव घेतला व हृदयविकाराचे कारण सांगितले, असा आरोप कवलदीप अरोरा व त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

मोतीराम थोरे हा गेंड्याच्या कातडीचा माणूस आहे, अशी चर्चा सध्या एन-५ परिसरात सुरू आहे. किती त्रास द्यावा याचीही मर्यादा असते. ज्यांचे घर आहे. त्यांनाच जीवे मारण्याच्या धमक्या देतो, राहतो तर राहतो पुन्हा शिरजोरी करतो. घर मालकालाच घरात घराण्यास मनाई करतो. यात त्याची पत्नी सुरेखा थोरे ही पण काही कमी नाही. नेहमीच जीण्यावरील पायऱ्यावर कधी तेल मिश्रीत पाणी टाकते. तर कधी निरमा पावडर असलेले पाणी टाकते. जेणे करून पायऱ्यावरून येणारा कोणताही व्यक्ती पडला पाहिजे व त्याला जखम झाले पाहिजे असे अनेक उपक्रम येथील कमी बुद्धी असलेले दाम्पत्य करीत असतात, अशी माहिती घर मालक कवलदीप अरोरा व त्यांची सूनबाई वरिंदर सुमीत अरोरा यांनी दिली. थोरे दाम्पत्य पोलिसांना सुद्धा दमदाटी करतात व विचारतात तुम्ही कोण? येथे तुमचे काय काम? मी माझ निपटून घेईल... यांच्यात इतकी मग्रुरी आली तरी कुठून. ११ महिन्यांचा भाडेकराराचा बॉण्ड केला आणि गेल्या अनेक वर्षांपासून राहत आहे. दोन वर्षांपासून तर भाडे देण्याचे नाव घेत नाही. संपूर्ण मालमत्तेचा वापर करतो आणि स्वत:ला या मालमत्तेचा मालक समजतो.

" तु आमची तक्रार करते काय? तुला व तुझ्या सासूला तुझ्या सासऱ्याजवळ पाठवून देवू अशा प्रकारे मारण्याची धमकी थोरे दाम्पत्य आमच्या कुटुंबाला देत आहेत. माझे कोणीही काही करू शकत नाही. कायदाला मी मोजत नाही.

– मोतीराम थोरे



### लोखंडी रॉडने सीसीटीव्हीची तोडफोड



२५ डिसेंबर रोजी त्याने या सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड केली आहे. लोखंडी रॉडने सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड केली आहे. याचे सर्व पुरावे वरिंदर सुमीत अरोरा यांच्याकडे असून ते अट्टलमतकडे देण्यात आले आहे.

### ४ एफआरआय व ९ एन.सी.

पोलिसांत ही त्याची तक्रार केली आहे. मी आतापर्यंत ४ एफआरआय व ९ एन.सी. ची नोंद केली आहे, कवलदीप अरोरो यांनी सिडको पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिस निरीक्षक अतुल येरमे यांच्या आदेशाने आरोपी दाम्पत्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### ११२ या क्रमांकावर फोन लावला तरी माझे काही होवू शकत नाही




११२ या क्रमांकावर अनेकदा थोरे यांची अरोरा यांनी तक्रार केली परंतु तरीही यांच्यात काहीही सुधारणा होत नाही. वारंवार त्रास देत असतात. गाडी आली तरी माझे काही होवू शकत नाही व काहीही करू शकत नाही. समज देतील याच्यावर ते काय करणार असे थोरे सांगतो. त्याला कायदाचा ही धाक राहिलेला नाही. कायदालाही मोतीराम थोरे मोजत नाही. कायदा देखील धाब्यावर बसवला आहे. असे तो म्हणतो.

### २५ डिसेंबरची धक्कादायक घटना

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

एन-५ परिसरातील सावरकरनगर येथे भाडेकरू दाम्पत्याने अमानुष कृत्य करत ७५ वर्षीय वृद्ध घरम ालकिणीला घरात कोंडून ठेवत दहशत निर्माण केल्याची धक्कादायक घटना २५ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे ३ वाजता घडली. या प्रकरणी सिडको पोलिसांनी मोतीराम नामदेव थोरे व सुरेखा मोतीराम थोरे या भाडेकरू दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

कवलदीप दिलजितसिंग अरोरा (७५, रा. सावरकरनगर, एन-५) यांच्या घरात आरोपी दाम्पत्य काही दिवसांपासून भाडेतत्त्वावर राहत आहे. २५ डिसेंबर रोजी दुपारी कवलदीप अरोरा एकट्याच घरात असताना आरोपींनी त्यांच्या घरासमोर येऊन मोठ्या आवाजात अश्लील शिवीगाळ सुरू केली. यानंतर दरवाजाला लाथा मारून दहशत माजवण्यात आली. भीतीमुळे वृद्ध महिलेने दरवाजा उघडला नाही.

यामुळे चिडलेल्या आरोपींनी घराचा मुख्य दरवाजा बाहेरून बंद करून कडी लावली. त्यामुळे वृद्ध महिला बराच वेळ घरात एकट्याच कोंडल्या गेल्या. या काळात आरोपींनी त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देत सतत शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घरात राहणाऱ्या दुसऱ्या महिलेने प्रकार लक्षात येताच धाव घेऊन दरवाजाची कडी उघडली व पोलिसांना माहिती दिली. त्यावेळी सुरेखा थोरे हिने त्या महिलेलाही शिवीगाळ करत धमकावले.

दरम्यान, कवलदीप अरोरा यांचा केअरटेकर ओम गुंजाळ घटनास्थळी पोहोचला असता आरोपींनी त्यालाही आत येण्यास मज्जाव केला. इतकेच नव्हे तर जिन्याच्या गेटला कुलूप लावून संपूर्ण इमारतीत दहशत पसरवली. त्यानंतर घरात बसवण्यात आलेल्या सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफफोड करण्यात आली.

पोलिस घटनास्थळी दाखल होताच दोन्ही आरोपी शांत झाले. सायंकाळी कवलदीप अरोरा यांनी सिडको पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस निरीक्षक अतुल येरमे यांच्या आदेशाने आरोपी दाम्पत्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकांचा धुरळा दोन टप्प्यांत

मुंबई : राज्यात नगर परिषद, नगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर आता महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. तर, दुसरीकडे जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचाही धुरळा लवकरच उडणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येते. महापालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होणार असून, ८ जानेवारीपूर्वी आचारसंहिता लागण्याची चिन्हे आहेत. जिल्हा परिषदेची निवडणूक दोन टप्प्यांत पार पडणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. पहिल्या टप्प्यात १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका अवघ्या २१ दिवसांत पार पाडल्या जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद निवडणुकांची घोषणा जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

३१ जानेवारीची डेडलाईन ओलांडणार?

उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका मात्र ३१ जानेवारीनंतरच घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी दिलेली ३१ जानेवारीची मुदत ओलांडली जाण्याची शक्यता आहे. सुप्रीम कोर्टात आरक्षण मर्यादा ओलांडल्या प्रकरणी २१ जानेवारी रोजी निर्देश येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सुनावणीनंतरच राज्य निवडणूक आयोग या निवडणुका जाहीर करण्याची शक्यता आहे.

पहिल्या टप्प्यात कोणत्या जिल्हा परिषदा

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये आरक्षण निश्चित करताना २० जिल्हा परिषदांमध्ये आणि २११ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेल्याने सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या निवडणुकांना स्थगिती दिली आहे. त्यामुळे सध्या केवळ आरक्षण मर्यादेचे पालन करणाऱ्या १२ जिल्हा परिषदांच्याच निवडणुका घेण्यात येणार आहेत. या यादीत सोलापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांचा समावेश आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या घोषणेकडे राजकीय पक्षांसह सर्वांचेच लक्ष लागले आहे. राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी तयारी पूर्ण केली असून, ८ ते १० जानेवारीदरम्यान अधिकृत घोषणा होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे.

# भूतकाळातून बोध, भविष्याकडे वाटचाल

नववर्ष म्हणजे केवळ कॅलेंडरवरील तारीख बदलण्याचा क्षण नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा, संकल्पांचा आणि नव्या आशांचा प्रारंभ असतो. सरत्या वर्षाला निरोप देत आणि येणाऱ्या वर्षाचे स्वागत करताना आपण काय कमावले, काय गमावले आणि पुढे काय साध्य करायचे याचा विचार होणे आवश्यक ठरते. विशेष म्हणजे २०२६ हे वर्ष राज्यासाठी 'भरती वर्ष' म्हणून घोषित झाल्याने सुशिक्षित बेरोजगारांच्या मनात नव्या संधींची आशा पल्लवित झाली आहे. त्यामुळे हे नववर्ष उत्सवापुरते न राहता रोजगार, जबाबदारी आणि परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्याचे प्रतीक ठरणार आहे. सन २०२६ हे वर्ष महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'भरती' वर्ष म्हणून ५ ऑक्टोबर २०२५ रोजी घोषित केले आहे. केव्हा एकदा २०२६ साल सुरू होऊन भरती होते असे राज्यातील सुशिक्षित बेकारांना वाटत आहे. त्यामुळे राज्यामधील सुशिक्षित बेरोजगारसुद्धा नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तयार आहेत. नवीन वर्षामध्ये रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होणार आहेत. त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत करताना सुशिक्षित बेरोजगारांच्या दृष्टिकोनातून भरती वर्ष म्हणून नववर्षाचे स्वागत केले जाणार आहे. आपण अजून चार दिवसांनी सरत्या वर्षाला 'गुड बाय' आणि नववर्षाला 'वेलकम' करणार आहोत. असे आपण दरवर्षी करत असतो. मात्र त्यातून आपण काय शिकलो याचा आपण सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे. नववर्षाच्या पहिल्या दिवशी आपण आनंद व्यक्त करीत असताना मागील वर्षात माझे काय चुकले याचे प्रत्येकांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. आज आपला देश ७९ व्या स्वातंत्र्य वर्षात वावरताना इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला तरी देशात खरंच आपण स्वातंत्र झालो का? याचा विचार सुद्धा होणे आवश्यक आहे. असे असले तरी बऱ्याचवेळा मागील वर्षामध्ये आलेली संकटे विसरून नवीन आठवणी जतन करीत असतो. अनेक लोक घरामध्ये रोषणाई व घराच्या समोर फटाक्यांची आतषबाजी करतात. म्हणे झाले गेलं विसरून नवीन जीवनाला सुरुवात करूया. महत्त्वाची बाब म्हणजे मागील वर्षाचा अनुभव गृहीत धरून, नव्या वर्षात नवीन उद्दिष्टे लक्षात घेऊन नवीन जीवनाला सुरुवात करू शकतो. यातून नवीन संधी मिळून नवीन दृष्टिकोन स्वीकारला जातो. म्हणजे आपल्या जीवनात सुधारणा करण्याची हीच वेळ असते. यातूनच नवीन प्रवास करण्याची अचूक वेळ मिळते. तेव्हा प्रत्येकांनी नवीन वर्षाची सुरुवात करताना आपल्या मागील वर्षातील चुका सुधारून नवीन वर्षात आपल्याला कसा फायदा होईल याचा शोध घेणे गरजेचे असते. यातूनच आपली प्रगती होत असते. नवीन वर्ष, नवीन सुरुवात असे जरी म्हणालो तरी यातून परिवर्तन होत असते. यासाठी नवीन संकल्प अतिशय महत्त्वाचा असतो. यातूनच विकासाची नवीन संधी प्राप्त होत असते. यात काही उद्दिष्ट्ये लक्षात घेता प्राधान्यक्रमानुसार सोडवू शकतो. यातूनच आपला उत्साह वाढण्यास मदत होते. आपल्या मनातील भीती दूर होऊन चांगल्या संधीचा मार्ग मोकळा होतो. त्यामुळे आपण नवीन वर्षानिमित्ताने जी उद्दिष्ट्ये डोळ्यांसम ेर ठेवतो त्याविषयी आपला आत्मविश्वास वाढून आपण प्रेरित होतो. नवीन वर्षाचे स्वागत करून नवीन वर्षाची सुरुवात करीत असतो तेव्हा मागील वर्षाचा विचार करणे गरजेचे आहे. आपण सर्वजन विविध क्षेत्रांत काम करत असताना आपण केलेले चांगले काम आणि काही कामात आलेले अपयश त्याचा आढावा घ्यावा. तसेच आपण मागील वर्षी कोणकोणती कामे केली अथवा नाही केली याचे चिंतन करून सुधारणा करण्यात याव्यात. आता वर्ष सुरू झाल्यावर आपली उद्दिष्टे निश्चित करून विविध क्षेत्रांनुसार वर्गवारी करावी. त्यानंतर त्यांची क्रमवारी लावून त्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. असे टप्प्याटप्प्याने करावे. म्हणजे वर्षभरामध्ये निश्चित केलेली उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली याची सहज कल्पना येते. याचा परिणाम पुढील काळात विकासाची दिशा ठरवू शकतो. असे असले तरी प्रत्येक उद्दिष्टांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. यामुळे आपल्या प्रगतीची कल्पना येते. तेव्हा आपल्याला प्रेरणा कशी मिळेल या दृष्टिकोनातून काम करावे. जेणेकरून आपण जी उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत त्या संदर्भात सकारात्मक दृष्टिकोन असायला हवा. आपले लक्ष विचलित होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. यासाठी चांगल्या लोकांच्या सहवासात राहणे, नियमितपणे व्यायाम, मान्यताप्राप्त पुस्तकांचे वाचन करावे. इतकेच नव्हे तर आपल्या मनाची सुद्धा तयारी असणे आवश्यक आहे. एखादा कठीण वाटणारा विषय कसा सोपा करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. आपण ठरविलेली उद्दिष्टे इतरांना सुद्धा सांगा. उद्दिष्टांच्या प्रगतीचा वेळच्या वेळी आढावा घ्या. ज्या उद्दिष्टांमध्ये आपण यशवंत झालो असू त्यांचा छोटेखानी यशस्वी विजय म्हणून साजरा करा. यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊ नये. नवीन वर्ष म्हणजे अंतिम परीक्षेचे वर्ष. त्यामुळे होणारी बोर्डाची परीक्षा विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा त्यांनी आपले लक्ष अभ्यासाकडे केंद्रित करावे. आता २०२६ या नवनिर्वाचित वर्षात पदार्पण करीत असताना प्रत्येकांनी लक्षात ठेवले पाहिजे की, नवीन वर्ष आहे तेव्हा मागील वर्षातील काही कटू अनुभव आलेले असतील, तर त्यांना बाजूला ठेवून परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करूया. भूतकाळ विसरून भविष्यकाळाचा विचार करूया. हे वर्ष भरती वर्ष असून वर्षभरात कशाप्रकारे भरती केली जाणार आहे याची सुद्धा सर्वांना कल्पना येणार आहे. तेव्हा भरती सत्र चालू असताना कोणावर अन्याय होणार नाही यावर करडी नजर ठेवायला हवी. कारण लोकशाहीप्रधान भारत देशाचे आपण सुजाण नागरिक आहोत याची जाणीव सर्वांना आहे. त्यामुळे आपला २०२६ या वर्षातील प्रवास सुखद होण्यासाठी वचनबद्ध होऊ या.

# भारतीय संस्कृती : काल, आज आणि उद्या

**भारतीय** संस्कृती ही जगातील सर्वांत प्राचीन, समृद्ध आणि सतत प्रवाही अशी संस्कृती मानली जाते. संस्कृती म्हणजे केवळ सण-उत्सव, पोशाख किंवा परंपरा नव्हे, तर ती जीवन जगण्याची एक सुसंगत दृष्टी आहे. मानवाचे विचार, भावना, मूल्ये, आचार, परंपरा आणि सामाजिक बांधिलकी यांचा समग्र आविष्कार म्हणजे संस्कृती होय. भारताची संस्कृती ही हजारो वर्षांच्या अनुभवातून घडलेली असून तिने मानवी जीवनाला केवळ जगण्याचे साधन दिले नाही, तर जगण्याचा अर्थ दिला आहे. म्हणूनच भारतीय संस्कृतीचा अभ्यास म्हणजे भूतकाळाची आठवण नव्हे, तर वर्तमानाचा विचार आणि भविष्याची दिशा होय.



**-डॉ. भारत कराड**
**प्राचार्य, सामाजिक व राजकीय विश्लेषक**

**काल :** मूल्याधिष्ठित संस्कृतीचा सुवर्णकाळ

प्राचीन भारतात संस्कृतीचा पाया अत्यंत भक्कम नैतिक तत्त्वांवर उभा होता. सत्य, धर्म, कर्तव्य, करुणा, संयम, सहिष्णुता आणि सहअस्तित्व ही भारतीय संस्कृतीची मूलभूत तत्त्वे होती. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, बौद्ध-जैन परंपरा आणि संतवाङ्मय यांनी समाजजीवनाला वैचारिक अधिष्ठान दिले. धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे, तर जीवन जगण्याची शिस्त होती. प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य ओळखून समाजासाठी योगदान द्यावे, ही संस्कृतीची शिकवण होती.

त्या काळी कुटुंबसंस्था ही संस्कृतीची पहिली शाळा होती. आई-वडील, गुरु, वृद्ध यांचा आदर, शिष्याने गुरुजवळ राहून शिक्षण घेणे, जीवनमूल्यांची जोपासना हे सर्व समाजाच्या रचनेत खोलवर रुजलेले होते. शिक्षणाचा उद्देश केवळ उपजीविकेची तयारी नव्हता, तर चारित्र्यनिर्मिती, आत्मविकास आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता. राज्यव्यवस्थेतही संस्कृतीचा प्रभाव स्पष्ट दिसत असे. राजा म्हणजे केवळ सत्ताधीश नव्हे, तर धर्मरक्षक मानला जाई. प्रजेच्या कल्याणासाठी राजाने स्वतःचा त्याग करणे हे त्याचे कर्तव्य होते. 'सर्वे भवन्तु सुखिनः' आणि 'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वांवर समाजव्यवस्था उभी होती. त्यामुळे भारतीय संस्कृती ही केवळ व्यक्तिकेंद्रित नव्हे, तर समाजकेंद्रित आणि मानवकेंद्रित होती.

**आज : संक्रमणात अडकलेली संस्कृती**

आजची भारतीय संस्कृती संक्रमणाच्या टप्प्यावर उभी आहे. आधुनिकता, तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि भौतिकवाद यामुळे जीवनशैलीत प्रचंड बदल घडून आले आहेत. माहितीच्या स्फोटामुळे ज्ञान वाढले आहे, पण त्याबरोबरच मानसिक ताण, अस्वस्थता आणि असुरक्षितताही वाढली आहे. पूर्वी जीवनात मूल्ये केंद्रस्थानी होती; आज सुविधा, गती आणि स्पर्धा केंद्रस्थानी आहेत.

कुटुंबसंस्था हळूहळू कमकुवत होत चालली आहे. संवाद कमी होत आहे, एकाकीपण वाढत आहे, परंपरा केवळ औपचारिकतेपुरती उरली आहे. भौतिक प्रगती झाली असली तरी मानसिक समाधान घटले आहे. संस्कृतीचा आत्मा जपण्याऐवजी तिचे बाह्य रूप जपण्यावर अधिक भर दिला जातो आहे. तरीही भारतीय संस्कृती पूर्णतः संकटात आहे असे म्हणता येणार नाही. कारण तिची मुळे फार खोलवर आहेत. सण-उत्सव, भाषा, लोकपरंपरा, धार्मिक श्रद्धा, कुटुंबातील नाते, समाजातील आपुलकी या सर्व घटकांमुळे संस्कृती आजही टिकून आहे. संकट हे तिच्या अस्तित्वाला नसून तिच्या दिशेला आहे. संस्कृतीला आता नव्या काळाशी सुसंवाद साधत स्वतःला नव्याने मांडावे लागणार आहे.

**उद्या :** नव्या युगातील संस्कृतीचे रूप

भविष्यात भारतीय संस्कृतीला दोन मोठ्या जबाबदाऱ्या पेलाव्या लागतील. एक म्हणजे आपल्या मूल्यांचा पाया जपणे आणि दुसरे म्हणजे आधुनिक जगाशी सुसंवाद साधणे. संस्कृती म्हणजे भूतकाळात अडकून राहणे नव्हे, तर कालच्या शहाणपणाचा उपयोग आजच्या आणि उद्याच्या जगासाठी करणे होय.

डिजिटल युगात संस्कृतीचे स्वरूप बदलणार आहे. संवादाचे माध्यम बदलले आहे, शिक्षणपद्धती बदलली आहे, जीवनशैली बदलली आहे; परंतु माणसाची गरज ङ्ग प्रेम, समज, सुरक्षितता, सन्मान आणि अर्थपूर्ण जीवन ङ्ग ही अजूनही तीच आहे. त्यामुळे संस्कृतीचे तत्त्वज्ञान आजही तितकेच आवश्यक आहे. शिक्षणसंस्था, कुटुंब आणि समाज यांनी एकत्र येऊन पुढील पिढीमध्ये मूल्यांची बीजे रुजवली पाहिजेत. केवळ कौशल्यवान नव्हे, तर संस्कारयुक्त नागरिक घडवणे हीच खरी प्रगती ठरेल.

**संस्कृती आणि राष्ट्रनिर्माण–** भारतीय संस्कृतीचा संबंध थेट राष्ट्रनिर्माणाशी आहे. संस्कृती सुदृढ असेल तर समाज सुदृढ राहतो, आणि समाज सुदृढ असेल तर राष्ट्र मजबूत बनते. आर्थिक विकास महत्त्वाचा आहेच, पण तो संस्कृतीविना अपुरा आहे. संस्कृती मानवाला माणूस बनवते; विकास केवळ सुविधा देतो. त्यामुळे दोघांचा समतोल आवश्यक आहे.

**निष्कर्ष–** भारतीय संस्कृती ही काळाच्या प्रवाहात वाहणारी, बदल स्वीकारणारी, पण आपल्या मूलभूत मूल्यांशी निष्ठावान अशी महान परंपरा आहे. ती भूतकाळाची आठवण, वर्तमानाचा आधार आणि भविष्याची दिशा आहे. या संस्कृतीचे रक्षण करणे म्हणजे केवळ परंपरा जपणे नव्हे, तर मानवतेचे रक्षण करणे होय. कालचा वारसा समजून घेऊन, आजच्या आव्हानांना सामोरे जात आणि उद्याच्या पिढीसाठी मूल्याधिष्ठित समाज घडवणे. हाच भारतीय संस्कृतीचा खरा आणि अखंड प्रवास आहे.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिन्याकरिता बंद

## भाविकांनी सहकार्य करण्याचे पुणे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादित पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानने घेतला आहे, भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखडा मंजुर केला आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष बांधकाम ाच्या काळातील सुरक्षितता लक्षात घेता २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीम ाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व श्री. भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वाच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदिर दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

सन २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे, त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ



२०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणारे लाखो भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादित पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे.

मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील. थेट दर्शन बंद या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही.

बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी कर्मचारी तसेच भीमाशंकर ग्रामस्थ वगळता कोणालाही श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचा विकास हा दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण करण्यासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर संस्थानने घेतलेला असून भाविकांनी व स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. डूडी यांनी केले आहे.

# वाळूज येथील संघमित्रा बुद्ध विहार येथे पेव्हर ब्लॉक सुशोभीकरणाचे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्या विशेष प्रयत्नातून सामाजिक न्याय विभागांतर्गत दहा लक्ष रुपये निधी मंजूर करून त्याचे उद्घाटन आज सरपंच सईदा नबी पठाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नंदकुमार गांधीले पाटील, पंचायत समिती माजी सभापती भारतीय जनता पार्टीचे श्री अविनाश गायकवाड, बाबासाहेब शिंदे पाटील, लक्ष्मण भराड, पाटील श्री रावसाहेब नरवडे, गणेश चव्हाण, गोरख हिवाळे, भीमराव दाभाडे, रावसाहेब निकम, शुभम बत्तीशे, रुपेश नाडे, किरण श्रीखंडे, रमेश हातोडे, विजय गायकवाड, संविधान बनकर, आकाश खिल्लारे, तय्यब शेख, दर्शन गायकवाड, धर्मेंद्र टोमके, धनराज चौहान आदी मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन संपन्न झाले. त्यावेळी श्री अविनाश गायकवाड यांनी आमदार प्रशांत बंब यांच्यासह सर्व उपस्थित त्यांचे आभार व्यक्त केले. शेवटी बुद्ध वंदनाने कार्यक्रमाचे सांगता झाली या विशेष उपक्रम ने परिसरातील सर्व उपासक उपासिकांनी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# वाळूज सर्कल राज्यातील विकासाचे एक रोल मॉडेल असेल : ज्योतिताई गायकवाड



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री ग्राम परिवर्तन मिशनमध्ये वाळूजसह ११ गावांचा समावेश ज्योतिताई गायकवाड म हत्वाची माहिती यांनी दिली. आमदार प्रशांत बंब यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभते नैसर्गिक संसाधने संसाधने व जैवविविधता लक्षात घेऊन वाळूज हे नवे विकासाचे मॉडेल शिवराई वाळूज येथे कौशल्य विकास प्रशिक्षण व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन ज्ञानिती इंडिया प्रा. ली. व ग्रामोदय प्रकल्प वाळूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते त्यात मोफत शिलाई मशीन, ब्युटीपार्लर, ऑटो रिक्षा, स्कुटी, ड्रोण दीदी आदी विविध मोफत प्रशिक्षण कार्यक्रमाचे शुभारंभ करण्यात आला त्यावेळी व्यासपीठावर ग्रामोदयचे प्रमुख श्री अविनाश गायकवाड, सौ. म नीषा बन्सल, मुख्यमंत्री ग्राम परिवर्तनचे श्री राजेश मुंडे, लोकराज्य संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय जाधव, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे श्री देशमुख साहेब, पुणे सहकारी बँकेचे श्री चौहान, श्री किरण कुलकर्णी, माजी सभापती तथा महिला महासंघाच्या सौ जोतीताई गायकवाड, गावचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्यआदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

प्रसंगी विविध प्रशिक्षण कार्यक्रमात सुमारे दोनशे चाळीस महिलांनी सहभाग घेतला असून प्रशिक्षण घेत आहेत, त्या प्रसंगी सौ गायकवाड बोलत होत्या पुढे बोलताना सांगितले की आतापर्यंत अपंग बांधव, विधवा महिला, जेष्ठ नागरिक, सांस्कृतिक कलावंत, शेतकरी बांधव, बांधकाम कामगार, आदिवासी, अल्पसंख्याक, किसान विमा, महिला विमा ,स्वयंसहाय्यता महिलांना, कर्ज अनुदान अश्या केंद्र सरकार व राज्यसरकार च्या सर्व महत्त्वकांशी योजना वविविध प्रकल्प तालुक्यातील वाळूज सर्कल एक महत्वाचे केंद्र बनले असून कोट्यवधींचा निधी मंजूर करण्यात असंख्य लाभार्थी तयार करण्यात आले आहेत.

आजही १०० लखपती दीदी ची निवड केली असून वाळूज सर्कलमध्ये एक हजार लखपती दीदी चे स्वप्न उदयास आणणे हे लक्ष असून येणाऱ्या आगामी काळात पायाभूत विकास सुविधा सह वाळूज एक विकासाचे मॉडेल आपल्याला दिसेल असेही प्रतिपादन त्यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन म ोईन शेख, यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार श्री अविनाश गायकवाड यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, सौ वैशाली, नवगैरे, सौ दिपाली नरवडे, सौ छाया पाटील, सौ ज्योती कुंजर, मानिशाताई साबळे, जान्हवी गायकवाड, आदींनी परिश्रम घेतले.

# आझाद अली शाह कॅम्पसमध्ये आनंदनगरी उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आझाद अली शाह शिक्षण संस्था खडकेश्वर द्वारे संचलित शायनिंग स्टार मराठी व इंग्रजी प्राथमिक शाळा आणि एम.जी.एम वस्तानवी उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेत आनंदनगरी चा कार्यक्रम दौलताबाद येथील कॅम्पस मध्ये अत्यंत हर्ष उत्साह हा त संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राज्य प्रवक्ता डॉ. पवन डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य हरणेमान कॉलेज व मराठवाडा करस्पॉन्डेन्ट पी.टी.आय. चे डॉ.प्रा.शाहेद शेख, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे माजी शहर अध्यक्ष हिशाम उस्मानी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रीय सचिव नासिर खान, मराठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक खान साजिद पाशा, एमजीएम वस्तानवी शाळेच्या मुख्याध्यापिका अमरीन खान तसेच शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थी व असंख्य पालक उपस्थित होते. आलेल्या सर्व पाहुण्यांचे खान साजिद पाशा यांनी शाल व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

विद्यार्थ्यांनी आलू पापड, पाणीपुरी, वडापाव,भेळ, पुरी भाजी, साबुदाणा वडा, व्हेज बिर्याणी, इडली, डोसा, चना मसाला, पान मसाला, पोहे ,पेरू, अंजीर ,चहा ,कॉफी अशा अनेक प्रकारचे दुकाने थाटली होती. यातून विद्यार्थ्यांनी व्यवहारी ज्ञान संपादन करत आनंद घेतला व कशा प्रकारे व्यवहार केला जातो याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. असंख्य पालकांच्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वी झाला.

यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेख आरिफ, मदिहा फातेमा, शुभांगी कुलकर्णी, वैशाली दाभाडे, दिनेश म्हस्के, खान सुमैय्या, धनश्री खिल्लारे, बुरहाणा पठाण, आशा ढाकणे, आफरीन तबस्सुम, शेख सुमय्या, शेख निदा, शेख निलोफर, नफीसा खाला , सलमा खाला आदींनी प्रयत्न केले.

# सावकारवाडा हॉटेलचे उद्घाटन





**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगरात प्यासा वाईन शॉप जवळ जाधवाडी चौकात सावकारवाडा व्हेज नॉन व्हेज हॉटेलचे उद्घाटन २७ डिसेंबर रोजी माजी पालकमंत्री अब्दुल सत्तार , विधान परिषदेचे आमदार संजय केणेकर, तसेच पैठणचे नगरसेवक विरसिंग करकोटक यांच्या हस्ते पार पडले. हॉटेलच्या शुभारंभानिमित्त बाळासाहेब सानप यांच्यासह नातेवाईक, मित्र मंडळींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. शुभेच्छा देण्यासाठी राजकीय क्षेत्रातील, सामाजिक क्षेत्रातील तसेच व्यापारी मंडळींनी उपस्थिती लावली होती. शुभेच्छा देताना आमदार केणेकर म्हणाले की, उद्योगात तरूणांनी मोठी मजल मारली पाहिजे. मराठी तरूणांनी उद्योग क्षेत्रात क्रांती केली आहे. तेजस प्रमोद मान्टे व शिवनाथ खेडकर यांच्या माध्यमातून सावकार वाडा या नवीन हॉटेलचा शुभारंभ करण्यात आला. ते म्हणाले की, एकदा आमच्या हॉटेलला भेट द्या व खात्री करून घ्या. जिभे बरोब र पोटाचीही काळजी आम्ही घेतो. शिवनाथ खेडकर व तेजस मान्टे यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे मनापासून धन्यवाद मानले.

# कामगार कल्याण कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

माथाडी कामगार कायदा तसेच अन्य कामगार कल्याण कायदे व योजनांची अंमलबजावणी न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करा व याबाबत दर आठवड्याला अहवाल सादर करा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या जिल्हास्तरीय कृती समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हा कामगार अधिकारी सुरेंद्रसिंग राजपूत, वखर महामंडळाचे अंकुश भाटेकर, जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक के. एस. पवार, काम गार संघटनांचे प्रतिनिधी सुभाष लोम टे, शेख हारुन, संतोष तळेकर आदी उपस्थित होते.

कामगारांची विविध आस्थापनांवर निवड होऊन त्यांच्या वेतनावरील लेव्ही कामगार मंडळाकडे वेळेत जमा न करणे, कामगारांच्या नियुक्त्यांसंदर्भात विविध प्रश्न, कामगारांना वेळेवर वेतन न दिल्यास दंड आकारणी करणे अशा विषयांबाबत चर्चा करण्यात आली. कामगार संघटनांनी यासंदर्भात त्यांचे प्रश्न मांडले.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, वखार महामंडळांनीही म ाथाडी कायद्याप्रमाणे काम करावे. काम गारांना त्यांच्या हक्काचे वेतन व अन्य लाभ मिळावे यासाठीच मंडळ आहे. कामगारांच्या हिताच्या कायद्यांची अंमलबजावणी हेतूपुरस्कर न करणाऱ्या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करा,असे निर्देश त्यांनी दिले. तसेच या कारवाई संदर्भात तसेच कामगारा संघटनांच्या विविध वैध मागण्यांबाबत सरकारी कामगार अधिकारी यांनी दर आठवड्याला अहवाल सादर करावा,असे निर्देशही दिले.

# बेपत्ता इसमाची माहिती कळवण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**


- बेगमपुरा परिसरातील रहिवासी असलेले सय्यद जाहेद निजामोद्दीन वय ४४वर्ष, व्यवसाय पान शॉप हे दि.१९ डिसेंबर २०२५ पासून बेपत्ता असल्याची फिर्याद त्यांचे पत्नी श्रीमती जकीया भ्र.जाहेद सय्यद यांनी सिटी चौक पोलीस ठाणे येथे दिली आहे. बेपत्ता इसमाची माहिती कळिवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. बेपत्ता इसम ाची पूर्ण माहितीः- नाव- सय्यद जाहेद निजामोद्दीन, , व्यवसाय पान शॉप, रा. अरब खिडकी, मस्जिद, बेगम पुरा, छत्रपती संभाजीनगर मो. नं. ९८२२११२२५९ वर्ण- सावळा, बांधा - मध्यम, उंची - ५ फुट ६ इंच, नाक - सरळ, डोळे - काळे, चेहरा - गोल, केस - पांढरे बारीक, दाढी- केस पांढरे वाढलेली, भाषा - मराठी, हिंदी, बोलतो, अंगात - आकाशी रंगाचा नेहरु शर्ट व पॅन्ट, मिलिंद हायस्कूल येथून दहावी पर्यंत शिक्षण झालेले, उजव्या हाताचे मनगटावर जुने जळाल्याचे व्रण, शारीरिक व मानसिक स्थिती चांगली, सोबत काही एक मौल्यावान चिजवस्तू नाही, मोबाईल सोबत नाही. या वर्णनाचा इसम कुणास आढळल्यास त्याबाबत सहायक फौजदार सईदखान मेहबुब खान, पोलीस ठाणे सिटी चौक यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती संभाजीनगर शहरात आचार्य गुणधरनंदीजी गुरुदेव यांचे भव्य आगमन

## लक्ष्मणचावडी येथे होणार उपाध्याय विरंजनसागरजी गुरुदेवाचा संत मिलन महोत्सव

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री.१००८ खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार व अंतर्गत मंदिराच्या वतीने प.पु.राष्ट्रसंत आचार्य गुणधरनंदीजी गूरुदेव हे छत्रपती संभाजीनगर शहरात दिनांक २८ रविवारी डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता अरीहत नगर बालाजीनगर मागाने लक्ष्मणचावडी येथे होणार आहे तेथे आचार्य गुणधरनंदीजी गूरुदेव व उपाध्याय विरंजनसागरजी गुरुदेव ससंघ यांचा भव्य गुरूमिलन सोहळा अदभूत होणार आहे.





यावेळी शोभायात्रेत सुमधुर बॅन्ड घोडागाडी रथ पथक राहणार आहे व आचार्यश्रींच्या पुढे मंगलकलश घेउफ्न महिला पुढे चालणार आहे. शोभायात्रेत म हिलांनी केशरी व पिवळया रंगाच्या साडया परिधान कराव्यात. गुरूमिलन महोत्सवासाठी भव्य असा स्टेज उभारण्यात आला आहे. लक्ष्मणवाडी, अभिनय टॉकीज, जाफर गेट, चौराहा, भगवान शांतीनाथ चौक, राजाबजार जैन मंदिर मार्गाने हिराकाका प्रांगण आचार्य गुप्तीनंदी गुरफ्देव सभागृह येथे शोभायात्रेचे विसर्जन होणार आहे यावेळी हिरकाका प्रागण येथे आचार्यश्रींचे विशेष प्रवचन व पादपक्षालन होणार आहे.

तरी समाज बांधवांनी वरील कार्यकमास मोठया संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, महावीर ठोले, यतीन ठोले, अरुण पाटनी ललीत पाटणी, संतोष सेठी, किरण पहाडे, जितेंद्र पाटणी, सौ.चंदा कासलीवाल, सौ.निता ठोले आदींसह समाज बांधवांनी केले आहे अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी केले आहे.

# बलिदान सप्ताह व वीर बालदिवसानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

दिनांक २५/१२/२०२५ गुरुवार रोजी औरंगाबाद जिल्हा लोहार गाडीलोहार समाज विकास संघटना संचलित भटक्या विमुक्त जाती जमाती इतर मागासवर्गीय वसतिगृह, शुभश्री कॉलनी एन ६, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे बलिदान सप्ताह व विर बालदिवस निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रमुख वक्ते श्री सरबजीत सिंगजी (सचिव, गुरुद्वारा भाई साहाब भाई सिंगजी, शहागंज, खालसा फाउंडेशनचे सचिव आणि महाराष्ट्र शीख असोसिएशनचे सक्रिय सदस्य म्हणून काम करत आहे. धार्मिक, सामाजिक आणि सामुदायिक सेवांमध्ये ते सतत समर्पित भावनेने कार्य करत आहेत.) सरबजीत सिंगजीनी बलिदान सप्ताह व विर बालदिवसाबद्दल महत्त्व सांगितले. गुरु तेग बहाद्दूर साहीब, गुरु गोविंदसिंग साहीब आणि त्यांच्या चार सुपुत्र यांचे शहारे आणणारे ऐतिहासिक बलिदानाचे चित्र डोळ्यासमोर उभे केले.वसतिगृहातील मुले व पालकांनी त्यांना जो बोले सो निहार सतब श्री अकाल, वाहे गुरु दा खालसा वाहे गुरु झी फतेह अशा उत्स्फुर्त घोषणा करत प्रतिसाद दिला. सोबत खालसा फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र शिख असोसिएशनचे अध्यक्ष उपस्थित होते. संघाचे चिकलठाणा, खडकी, वाळुज विभागाचे विस्तारक राजेंद्रजी मेहता ह. भ. प. सतिषजी गिरी महाराज (एम एस मराठी. पैठण ला तुकाराम ग्रंथ गाथा परिचय अभ्यास झाला. ज्ञानेश्वरी अभ्यास करताहेत.) चिकलठाणा यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच डॉ. अस्मिता निंबाळकर, (एम. ए. डिप्लोमा इन सायकॉलॉजी) यांनी मुलांना आहार, योग, जिवनशैली संदर्भात मार्गदर्शन केले आणि पालकांच्या मनातील मुलांच्या समस्येचे निराकरण केले. औरंगाबाद जिल्हा लोहार गाडीलोहार समाज विकास संघटनेचे श्री. प्रदीपजी वाघ, श्री. विष्णुजी पोपळघट, श्रीमती मिराजी पोपळघट, श्रीमती सुनीताजी पवार श्री.रमेशजी पोपळघट, ॲड. गणेशजी हिवाळे, श्री. पंडीत मांडुळकर, श्री. दिपकजी खंडागळे (संगीत विषारद) श्री. सतिषजी खंडागळे (सेवासंकल्प खादी) श्री. विश्वजीतजी पवार (इंग्लिश व्हिजन अकॅडमी), श्री. गोविंदजी पवार (पॉवर अबॅकस) आणि वसतिगृहातील बालगोपाल मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाला श्री. रविजी वैद्य यांनी विषेश मेहनत घेतली

# ‘स्मार्ट’अंगणवाडीसाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील अंगणवाडी स्मार्ट करण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम तयार करावा,असे निर्देश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

महिला बालविकास विभागाच्या विविध योजनांचा आढावा आज जिल्हाधिकारी स्वामी यांनी घेतला. प्रधानमंत्री मातृवंदना योजना, अंगणवाडी विकास, बाल भिक्षेकरी निर्मूलन, बाल मृत्यू प्रतिबंधक अभियान, कुपोषण मुक्ती अभियान, बालविवाह रोखणे अशा विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मंगला पांचाळ, बाल विकास अधिकारी गणेश पुंगळे, तालुका बालविकास अधिकारी मनिषा कदम, जी.आर. अंधारे, संतोष जाधव, श्रीमती कल्पना देशमुख तसेच सर्व तालुका बालविकास अदिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षक आदी दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील लाभार्थी गरोदर महिलांची नोंदणी, त्यात येत असलेल्या तांत्रिक अडचणी याबाबत माहिती देण्यात आली. जिल्ह्यातील अंगणवाडी ह्या स्मार्ट करण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न व्हावेत. त्यात ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग असावा. सर्व शासकीय विभागांनी सम ायोजनातून हा उपक्रम राबवावा. त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## गुरु रविदास केंद्रीय जयंती उत्सव समितीची स्थापना

# संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या ६४४ व्या जयंतीनिमित्त भव्य आयोजनाची तयारी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या ६४४ व्या केंद्रीय जयंती उत्सवाच्या आयोजनासाठी गुरु रविदास केंद्रीय जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली आहे. टी. व्ही. सेंटर येथील कार्यालयात झालेल्या बैठकीत माजी सहायक पोलीस आयुक्त बालाजी सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या बैठकीत उत्सवाचे नियोजन, सामाजिक प्रबोधनात्मक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच समाजातील सर्व घटकांचा सहभाग वाढविण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मार्गदर्शक व सल्लागार म्हणून बालाजी सोनटक्के यांची निवड करण्यात आली असून त्यांनी गुरु रविदास महाराज यांच्या विचारांचा समाजात व्यापक प्रसार व्हावा, यासाठी समितीने संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले. कार्यकारिणी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली : अध्यक्ष : ॲड. चंद्रकांत गोरे, सचिव : ॲड. संतोष मिमरोट, कोषाध्यक्ष : सुरेश गवळे, कार्याध्यक्ष : सुभाष बरोदे. बैठकीस सुरेश गवडे, रघुनाथ पदमे, चंद्रकांत गोरे, पद्मिनी इनवते, हंसराज बनस्वाल, बालाजी माने, माणिकराव हिरेकर, बन्सीलाल कुचे, पुनमचंद शिखरे, प्रवीण बोर्डे, राजू डोंगरे, शंकर बावस्कर, गणेश बारसावणे, दिलीप उमरे, संजय बावस्कर, आशा बारसावणे, मदन भगुरे, विष्णू घोडके, कारभारी लोखंडे, इंजि. गजानन जोहरे, जवाहरलाल भगुरे, अर्जुन सुरोसे, रामलाल पुसे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, गुरु रविदास महाराजांचे समता, बंधुता व मानवतेचे विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी जयंती उत्सवाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. भव्य मिरवणूक, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून हा उत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. गुरु रविदास महाराजांच्या विचारांना नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करत या समितीच्या माध्यमातून सामाजिक एकोपा व सद्भावना वृद्धिंगत करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

# जैन टॅगच्या अध्यक्षपदी जयश्री लोहाडे तर उपाध्यक्ष पदी उज्वला पाटनी, सचिवपदी पुजा झाझरी, कोषाध्यक्षपदी सीमा बडजाते यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी कार्यात अग्रेसर असलेल्या व वर्षभर विविध नवनवीन उपक्रम राबविणा- जैन टॅगच्या अध्यक्ष पदी जयश्री सचिन लोहाडे तर उपाध्यक्ष पदी उज्वला नवीन पाटनी ,सचिव पदी पुजा पकज झाझरी कोषाध्यक्ष पदी सीमा विशाल बडजाते यांची २०२६ साठी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी जैन टॅगच्या संरक्षिक अनुपमा दगडा दिपीका बडजाते,, यांच्या मार्गदर्शनाखालील हि निवड करण्यात आली.

यावेळी मावळत्या अध्यक्षा श्श्वेता कासलीवाल यांनी आपला पदभार नुतन अध्यक्षा जयश्री लोहाडे यांच्याकडे सोपविला. यामध्ये कार्यकारणी मध्ये रिना ठोळे याशिका पांडे स्वाती कासलीवाल, छाया कासलीवाल श्श्वेता कासलीवाल, रचना पहाडे, नेत्रजा, मिताली काला, रानु सेठी, सारिका बडजाते, किर्ती पाटणी, सपना पाटणी, सिमी पहाडे, मोनिका चादीवाल, श्वेता सेठी, रिचा कासलीवाल पुर्वा कासलीवाल दिपाली पाडे श्वेता गगवाल आदींची सदस्य पदी निवड करण्यात आली.

नुतन कार्यकारणीला सकल जैन सम ाज,खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार चे अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, अरीहतनगर मंदिराचे अध्यक्ष सतोष

अजमेरा महावीर ठोले आदींनी शुभेच्छा दिल्या. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199